
Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 47026)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL



Volume - IX, Issue - II
March - August - 2021

Marathi Part - III / Hindi

Impact Factor / Indexing
2019 - 6.601
www.sjifactor.com

AJANTA PRAKASHAN

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"IDEAL"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**IDEAL - ISSN 2319 - 359X - Impact Factor - 6.601** (www.sjifactor.com)

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चलन विषयक व आर्थिक विचार<br>**डॉ. एम. व्ही. हिरे** | ६३-६६ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही संदर्भातील विचार<br>**सहा. प्राध्यापक एस. एस. तायडे** | ६७-७१ |
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक सुधारणा<br>**प्रा. डॉ. भिमराव प्रल्हाद उबाळे** | ७२-७७ |
| १५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मुलन विषयक विचार<br>**प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे** | ७८-८४ |
| १६ | महिला सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन<br>**प्रा. डॉ. निता सोमनाथे (गभने)** | ८५-९० |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता<br>**डॉ. के. जी. वाकोडे** | ९१-९४ |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जाती निर्मुलन विषयक विचार<br>**प्रा. तळणीकर एस. जी.** | ९५-९८ |
| १९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता<br>**प्रा. सुलक्षणा हरी कोळी** | ९९-१०३ |
| २० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संबंधी विचार : एक चिकित्सक अध्ययन<br>**डॉ. सुभाष दौलतराव उपाते** | १०४-१११ |


Adarsh Arts & Commerce College (Desaiganj)

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# २०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संबंधी विचार : एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. सुभाष दौलतराव उपाते**
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख, आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली.

**प्रस्तावना**

डॉ. आंबेडकरांचे स्वातंत्र्याविषयीचे चिंतन अधिक सखोल, मूलगामी आणि सर्वसमावेशक होते. राजकीय स्वातंत्र्यासोबतच अल्पसंख्यांकांना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वतंत्र्यही लाभावे त्यांची रास्त धारणा होती. 12 नोव्हेंबर 1930 ला पहिल्या गोलमेज परिषदेत भाषण करतांना ते म्हणतात, "आम्हाला असे सरकार पाहिजे की, जे देशाचे खरे हित निष्कापूर्वक साधेल आणि न्याय आणि निकडीचे असे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न कुणाच्याही रागालोभाची पर्वा न करता सोडविल."[1] मुंबई येथील दामोधर हॉलच्या पटांगणातील भव्य सत्कारात बाबासाहेब म्हणाले होते, "सध्या हिंदू, मुसलमान, अस्पृश्य या सर्वांना स्वराज्य मिळत असल्यास पाहिजे आहे. नुकत्याच नागपूर येथे झालेल्या अ. भा. दलित कॉंग्रेसने तसा ठरावही पास केला आहे. याबद्दल सर्वांची एकवाक्यता आहे. परंतू वाद आहे तो स्वराज्याने मिळणारी सत्ता सर्व समाजामध्ये योग्य रीतीने विभागली जावी की, एखाद्या विशिष्ट वर्गाच्या हातीच ती राहावी या संबंधाने आहे."[2] डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "काही लोक म्हणतात की, आम्ही प्रथम भारतीय आहोत आणि नंतर हिंदू किंवा मुसलमान आहोत. मला हे पसंत नाही. हे पुरेसे वाटत नाही. धर्म, संस्कृती आणि भाषा वगैरेतून निर्माण होणाऱ्या कोणत्याही स्पर्धक निष्ठेमुळे, आपली भारतीय म्हणून असलेली निष्ठा धोक्यात येता कामा नये. लोकांनी भारतीय आणि फक्त भारतीयच राहावे. त्याखेरीज अन्य काही असू नये."[3] रावसाहेब कसबे म्हणतात त्याप्रमाणे, "सोलिगमन सारख्या शिक्षकांच्या प्रभावातून आंबेडकरांच्या ठिकाणी मार्क्सवादी विचरांचे सुप्त आकर्षण निर्माण झाले होते."[4]

"लोकशाही हा त्रिकालबाधीत सर्वोत्तम शासनप्रकार आपण मानीत नसल्याचे नमूद करून इ. स. 1938 मध्ये ते असे म्हणाले होते की, तेव्हाच्या देशकाल परिस्थितीत तर लोकशाही हा सर्वात अनुचित शासनप्रकार ठरेल. काही काळ तरी प्रबुद्ध हुकुमशहाच्या बळकट हातात भारताची राजकीय सूत्रे राहण्याची गरज त्यांनी प्रतिपादली होती. एकाच संघटनेशी अचिकित्सपणे स्वत:ला बांधून घेतलेली तात्कालीन निर्बुद्ध लोकशाही, म्हणजे फार मोठी व्याधी असल्याचेही ते म्हणाले होते"[5]

15 ऑगष्ट 1947 रोजी ब्रिटिशांची राजवट संपुष्टात येऊन भारत स्वतंत्र झाला व आपण आता 15 ऑगष्ट 2022 ला अमृतमहोत्सवी साजरा करणार आहोत. "मुळातच विविध विचारसरणीच्या, विविध धर्म, जाती-वर्ग-पंथाच्या व



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

सांस्कृतिक समूहांच्या सहभागातून आणि संघटित संघर्षातूनच हे यश प्राप्त झालं होतं. 15 ऑगष्ट चा तो दिवस या दृष्टीनेही ऐतिहासिक म्हणावा लागेल की, या विविध जनसमूहांनी प्रथमच स्वतंत्र लोकशाही देशाचे नागरिक – अर्थात भारतीय अशी संयुक्त ओळख धारण करून त्या दिवशी आपल्या जीवनाची नव्याने वाटचाल सुरू झाली पंरतू तीही अनेकविध समस्याचं ओझं घेऊन आणि सर्वांगिन मोठी स्वप्न उराशी बाळगून आपल्या नवस्वतंत्र देशाने वाटचाल सुरू केली."[6] विशेषत: आपल्या सारख्या विषमता, प्रातियता, जातीयता, सांप्रदायिकता आदि समस्यांनी ग्रस्त असलेल्या देशात अनेक अंतर्विरोध दिर्घकाळ कायम राहिलेले आहेत हे लक्षात घेता सर्वच घटकांची वर्गाची भावविश्व एकसारखीच असतात असं म्हणता येत नाही. या सात दशकांतील घडामोडी पाहता सामाईक धामे जुळून येतात. असेच धागे एक सामाईक भावविश्व निर्माण होण्यास सहाय्यभूत ठरल्याचे लोकशाहीतील स्वातंत्र्य, समता, बंधूता, अधिकार, न्याय या विविध मूल्यांद्वारे दिसून येतात.

आपल्या लोकशाही देशात पर्यायी विचारप्रवाहांना वाव राहिलेला आहे. त्यामुळेच प्रत्येक पिढीत पर्यायी विचारप्रवाहांचा पुरस्कार करणारे लक्षणीय प्रमाणात दिसून येतात. त्यांची परिणामकारकता कमी-अधिक तिव्र राहिली, तरी त्याचंही प्रतिबिंब समाजमनावर उमटलेच दिसतं. प्रत्येक व्यक्तीमन आपआपल्या मानसिकतेनुसार सापेक्ष दृष्टिकोणातून विविध घटनांचे पडसाद टिपत असतं. शिक्षणाचा वा सामाजिक जाणीवेचा अभाव, रूढींचा पगडा, आर्थिक, सामाजिक परिस्थितीमुळे स्वीकारलेली समाजशरणता, उत्पादनसाधनांवर नियंत्रण करणाऱ्या शक्तींनी केलेल्या मूल्य प्रसाराचा प्रभाव, पूर्वापार चालत असलेल्या मूल्यव्यवस्थेशी फारकत घेण्याची अनिच्छा व दृष्टी 'बाधीत' करणाऱ्या अशा गोष्टी लक्षात घेणं जरूरीचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक प्रयत्नांतून राज्यघटना सिद्ध झाली व 26 जानेवारी 1950 रोजी ती स्वीकृत झाली व प्रजासत्ताकाची घोषणा झाली. बाबासाहेब आंबेडकरांची विद्वत्ताव्यासंग, इतिहासाचं भान, राज्यघटना व कायदा याविषयीचा अभ्यास, भारतीय समाजात (जात, धर्म, भाषा, परंपरा व संस्कृती) व त्या समाजातील प्रस्थापित विषमतेचं त्यांनी केलेलं विश्लेषण या सर्व बाबींचा जसा आपल्या संविधानावर संस्कार आहे; सर्व धर्माची शिकवण प्रेम व शांतता आहे असं म्हणण्याची प्रथा आहे. हिंदू धर्म 'सहिष्णू' आहे. असं स्वत: हिंदूच सांगतात. पंरतू त्यांनीही 1947 साली केलेल्या अत्याचारांचा इतिहास या शांतताप्रेमी धर्माला लाज आणणारा आहे. 'इस्लाम' चं प्रागतिक स्पष्टीकरण देणारे त्या शब्दाचा आशय आणि अर्थच प्रेम व शांतता असल्याचं सांगतात. पंरतू त्या धर्माच्या नावावर झालेले अत्याचार आणि हिंसाचार त्यांनाही मान खाली करायला लावणारे आहेत. धर्म, वंश, भाषा, विचारसरणीचा दुराग्रह यामुळे रशिया , चिन, युगोस्लाविया, अंगोला, कंबोडिया, बुरूंडी, रवांडा, श्रीलंका, अफगाणिस्तान, इराण, इराक अशा अनेक देशांमध्ये कत्तली झाल्या हे संदर्भाकीत म्हणून म्हणता यईल.

1968 मध्ये म्हणजे देशात एकूण 4 सार्वत्रिक निवडणूका होऊन गेल्यावरही एका ब्रिटिश पत्रकाराने म्हटले की, "भारताचा प्रश्न तसाच शिल्लक राहतो, तो म्हणजे हा देश एकत्रित राहू शकेल काय? की त्याचे तुकडे पडतील? हा देश



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

महाकाय आहे आणि लोकसंख्याही तशीच प्रचंड आहे. वेगवेगळे आणि एकमेकांशी संघर्ष करणारे धर्म इथे आहेत. असंख्य जमाती व वंशाचे लोक आहेत. त्यामुळे भारत हा एक देश म्हणून संघटीत राहील यावर विश्वास बसणं सुध्दा अशक्य आहे."[7] आणि तोच पुढे म्हणतो की, "मनातल्या मनात संपूर्ण भारताचं एकत्रित चित्र समावणं सुध्दा अतिशय कठीण आहे. महान हिमालयाची उत्तुंग पर्वतराई, प्रखर सुर्यप्रकाशाने करपलेलं आणि घणघोर पावसाने झोडपलेलं गंगेचं विस्तीर्ण खोरं, पूर्वेकडील पूरग्रस्त प्रदेश, कलकत्ता, मुंबई आणि मद्रास सारखी महानगर असलेला हा भारत बराचवेळा एकच देश आहे असं भासतही नाही. तरीसुध्दा संपूर्ण भारतामध्ये एकप्रकारची अशी विलक्षण लवचिकता आहे की, तो देश एकत्व आणि एकात्मताही टिकवूण ठेवेल असं वाटत राहतं. भारतीय आत्मा म्हणून जणू काहीतरी अस्तित्वात आहेच आहे......... किंबहुना संपूर्ण आशिया खंडाचं भवितव्य भारत एक देश म्हणून टिकण्यावर अवलंबून आहे. असं कोणी म्हणत असेल तर मला ते मुळीच अतिशयोक्तीपूर्ण वाटणार नाही."[8] खरं तर या भूप्रदेशाची एक देश म्हणून जेव्हा जडणघडण झाली तेव्हापासूनच कितीतरी भारतीयांना व परदेशियांना असच वाटत आलं आहे की, "इथे इतकी विविधता आहे की, एक देश म्हणून टिकाव लागणं शक्य नाही आणि इथली गरीबी इतकी प्रचंड आहे की, लोकशाही टिकणार नाही."[9]

"सांसदीय लोकशाही हा सर्वोत्तम शासनप्रकार नसून, जनतेला त्यात स्वातंत्र्य, संपत्ती व सुखाची खात्री बाळगता येत नसल्याचे आवर्जुन सांगितले होते. ही लोकशाही, करार स्वातंत्र्याला पावित्र्याचे आवरण चढवून आर्थिक विषमतेकडे मात्र डोळेझाक करते. या करार स्वातंत्र्यामुळेच शक्तीसंपन्न गट दुर्लक्षित गटांना लुबाडू शकतात. स्वातंत्र्याचा गजर करणारी ही लोकशाही गरिबांच्या विपन्नतेतूनच अधिकाधिक भर घालते. अशा लोकशाहीतील स्वातंत्र्य समतेला गिळून टाकते." असे इ.स. 1943 साली दिल्ली येथे कामगार चळवळीतील कार्यकर्त्यासमोर बोलतांना म्हटले होते. [10] डॉ. आंबेडकर म्हणतात, प्रत्येक व्यक्तीला अंगभूत मूल्य असते, स्त्री-पुरूष, श्रीमंत-गरीब, शिक्षित- अशिक्षित, बलिष्ठ — दुर्बल, स्पृश्य-अस्पृश्य या भेदभावांना मुळीच विचारात न घेतले जाता, प्रत्येक व्यक्तीला विकासाच्या सर्व संधी उपलब्ध व्हायलाच पाहिजेत. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे साधन म्हणून वापरली जावू नये. समाजाखातर व्यक्तीचा बळी दिला जाऊ नये. प्रत्येक व्यक्तीला समान स्वातंत्र्य असावे. व्यक्तित्वमूल्याची प्रतिष्ठा सर्वसामान्य व्हावी , मुक्त व्यक्तीमत्वाच्या (Free Individually) नैतीक तत्वाची प्रतिष्ठापणा व्हावी आणि त्यातून न्याय्य समाजाची उभारणी व्हावी; या अपेक्षा फक्त लोकशाहीतच पूर्ण होऊ शकतात. असा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केला आहे. राजकीय क्षेत्रात व्यक्तीच्या, धार्मिक नैतिक क्षेत्रात सद्सद विवेकाच्या आणि आर्थिक क्षेत्रात ग्राहकाच्या सार्वभौमत्वावर लिबरल लोकशाहीचा भर असतो. ती सामान्य मानसाच्या शहाणपणावर भरवसा ठेवते, हे त्यांना विशेष महत्वाचे वाटते. प्रत्येक व्यक्तीला सन्माननिय नागरिक म्हणून जगता येण्यासाठी जे लागते ते सर्व काही लाभेल अशी समाजव्यवस्था निर्माण करणे; हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते लोकशाहीचे साध्य असते. असे ते म्हणतात.



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कशाला विरोध होता, तो म्हणजे, व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व चिडणाऱ्या कोणत्याही अधिसत्तावादी सर्वंकष व निरंकुश राज्यपध्दतीला, या संदर्भात ते म्हणतात, व्यक्तीला काही अदेय हक्क असतात आणि त्याची हमी संविधानाने द्यायलाच हवी. कोणालाही विशेषाधिकार दिल्यामुळे व्यक्तिला आपल्या संविधानिक हक्काचा त्याग करण्यास भाग पाडू नये. शासनकारभार करण्याची सत्ता राज्यसंस्था कोणालाही खाजगी व्यक्तींना देणार नाही ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते राजकीय लोकशाहीची आधारभूत गृहितके आहेत. सर्वांना अधिकाराचा लाभ मिळावा, सर्वांच्या मागण्या व हितसंबंध यात सुसंवाद, अल्पसंख्यांकाच्या हिताला संरक्षण देण्याचे सौजन्य बहुसंख्यांकाजवळ असावे, त्यातून प्रगल्भ लोकशाही निर्माण होऊन व्यक्तीच्या मूलभूत हक्कांना संरक्षण हे काम राज्यसत्तेचे प्रमुख पद्धतशिरपणे करतील तेव्हाच राज्यसत्ता निरंकुश न बनता, व्यक्तीच्या लहरीनुसार राज्यकारभार न चालता, विवेकी तत्वाप्रमाणे चालावा, अर्थात "कायद्याचे अधिराज्य" (Rule of Law) ही संकल्पना डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचाराचा केंद्रबिंदू अस्तित्वात येईल. कायद्यातून जीवित –वित्ताला व स्वातंत्र्याला वचितपणा लाभू नये. लोमताचे प्रतिबिंब उमटावे यासाठीच तर त्यांनी प्रतिनिधीक शासन सांगितले. जनसंमतीद्वारे तिथे सत्तेचे रूपांतर निरंतरपणे अधिसत्तेत घडत असल्यामुळे राज्यसत्तेची अधिमान्यता अखंडपणे टिकणार यावर त्यांचा विश्वास होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांसदिय शाशनपध्दतीमुळे व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशिलता व जबाबदारीची जाणीव, सहकार्य, शिस्त, समर्पणादी गुणांचा परिपोष, उच्च प्रतिचे राष्ट्रीय चारित्र्य आणि शिल, सचोटी, उघम व धारिष्ट्य हे सदगुण विकास पावतील. म्हणूनच डॉ. आंबेडकर म्हणतात, "समाजरचनेत आपल्याला मानाचे स्थान आहे, अशी जाणीव जागवून व्यक्तीच्या मुक्तीचा मार्ग सांसदीय लोकशाहीत खुला होतो. रक्तपात न घडता सामाजिक-आर्थिक क्षेत्रात मूलभूत स्वरूपाचे बदल घडवून आणण्याचा मूलमंत्र फक्त सांसदिय लोकशाहीलाच अवगत असून तीच मानवी जीवनाच्या प्रवाही स्वरूपाशी सुसंगत ठरते, अशा शब्दात डॉ. आंबेडकरांनी या शासनपध्दतीचा गौरव केला आहे."[11]

राजकीय पक्षांच्या संदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात, स्वातंत्र्याचे रहस्य धारिष्ट्रात असते, एकपक्षीय पध्दतीचा स्वीकार करणे, त्यांच्या लोकशाहीनिष्ठेला मानवणारे नव्हते, कारण एकपक्षीय शासन हे जुलूमशाहीला निमंत्रणच असते. लोकांच्या शासनाला ते नेहमी मारकच असते. निवडणूकीच्या मार्गाने जरी तो सत्तेवर आला तरी हुकूमशाहीला पायबंद बसण्याची मुळीच हमी मिळत नाही."[12] संविधानिक नितीमत्ता प्रत्येक नागरिकाने अंगी बनवलीच पाहिजे. संविधान बाह्य वर्तन कोणीही करता कामा नये. लोकप्रतिनिधींनी केलेला कायदा हा लोकमताचा अविष्कार व लोकांची संमत्ती हे लोकशाहीचे गृहित असल्याने नागरीकाला कायदा भंग करण्याचा अधिकार नाही. अशी एकंदरीत डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. विषमताधिष्ठीत हिंदू धर्मापेक्षा स्वातंत्र्य, समता व बंधूता या लिबरल मूल्यांशी सुसंवादी असणारा बौद्ध धर्म अधिक स्विकार्य वाटला. बौद्ध धर्माचा स्विकार हे आंबेडकरांच्या आत्मविश्वास, माणसिक स्वातंत्र्य व भौतिक शक्ती



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

मिळावी व त्यांना ऐहिक अभ्युदयाच्या दिशेने नेण्याचे ते साधन होते. लोकशाहीचा आदर्श म्हणून त्यांनी बौद्ध भिक्षू संघाकडे बोट दाखविले आहे. खाटमांडूच्या त्यांच्या गाजलेल्या भाषणात त्यांनी बौद्ध धर्म आणि मार्क्सवाद यांच्यातील सांधर्म्य स्थळ सांगून मार्क्सवादाच्याच साध्य – साधनांना लोकशाही मूल्यांची जोड बौद्ध धर्म देत असल्यामुळे तो अधिक श्रेयस्कर असल्याचे म्हटले होते.

आंबेडकरांच्या मते, लोकशाही केवळ एक घोषणा किंवा शासनप्रकार असून चालत नाही तर तो समाजाने स्वीकारलेला जीवनमार्ग असावा लागतो. सद्सद् विवेकाअभावी अमेरिकेतील नीग्रो, जर्मनीतील ज्यू आणि भारतातील अस्पृश्य यांचे हक्क असून नसल्यासारखेच ठरतात. शासनापेक्षा समाज अधिक जाचक ठरतो तसेच अधिक कडक छळ व जूलूम करू शकतो म्हणूनच डॉ. आंबेडकरांची ही धारणा समाजाचे लोकशाहीकरण होणे आणि ते समाजाच्या रूढी – परंपरांतून व नित्यव्यवहारातून अभिव्यक्त होत राहणे; त्यांना लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक वाटते. ज्या समाजात भिन्न सामाजिक गटांच्या सांस्कृतिक दृष्टीकोणात प्रबळ तफावती असतात आणि भिन्न लोकसमूहाच्या ठायी सहजीवनाची भावनाच अपूरी वा अनुपस्थित असते. तिथे लोकशाही मध्यवर्ती सूत्र आहे. जातीच्या राजकारणाद्वारे इथल्या लोकशाही संस्था व प्रक्रिया असफल होण्याचा धोका त्यांनी निदर्शनास आणला होता. धर्मनिरपेक्षता खोल मुरलेल्या युरोपातही जर खऱ्या अर्थाने प्रातिनिधीक सरकार अस्तित्वात येऊ शकत नाही, तर भारतात जीथे 'क्रियाशील ईश्वरशास्त्र' (Theology in Action) अशी राजकारणाची स्थिती आहे; भारतातील दलित, शोषित वर्गांना या ईश्वरशास्त्रापासून संरक्षण देण्याची गरज आंबेडकरांनी अधोरेखीत केली आहे. आंबेडकरांनी, 'एक व्यक्ती, एक मत' यापेक्षा 'एक व्यक्ती, एक मूल्य' हे तत्व लोकशाहीसाठी अधिक मोलाचे वाटते. सामान्य शेतकरी, भू-हिन, शेत मजूर, कामगार व पूर्वास्पृश्य या सर्वांची वर्गीय एकजूट हे ध्येय ठेवूनच स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापनाही आंबेडकरांनी केली होती. दारिद्रय हेच अनेक सामाजिक विकृतीचे, राजकीय हक्क शून्यतेचे आणि धार्मिक अंधश्रध्दांचे मूलकारण आहे. म्हणून त्यांनी उत्पादन साधनांवर राज्याची मालकी असावी अशी मागणी केली होती.

जातीयता-धार्मिकता यांचे राजकारण करणे, दलितांमधील फाटाफुटी आपल्या सत्ताकरणासाठी वापरणे, त्यांचे जीवन मरणाचे प्रश्न दुर्लक्षिणे, उत्पादन वितरणादी आर्थिक प्रक्रिया मूठभर धनिकांच्या हितार्थ राबविणे, हक्कांसाठी शोषीतांनी केलेले लढे निर्घुणपणे दडपणे, पुरोगामी कायद्यांमधील पळवाटा वापरून त्यांचा परिवर्तनवादी आशय निकालात काढणे, तत्वशून्य तडजोडी करून सत्तेवर टिकून राहणे, अशा प्रकारात व्यस्त असलेल्या राज्यकर्त्या वर्गाकडून दलितमुक्तीची अपेक्षा बाळगणेच निरर्थक ठरते. तेव्हा आंबेडकरांना, त्यांच्या काळात घ्याव्या लागणाऱ्या भूमिका आज संदर्भासह तपासून त्यांची ग्राह्यग्राह्यता दलित कार्यकर्त्यांनी ठरविणे, हेच खऱ्या अर्थाने आंबेडकरांचे अनुयायीत्व करणे होईल. डॉ. आंबेडकर , भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत, हे विधान दलित चळवळीतील तरूण जितक्या लवकर डोक्यातून काढून टाकतील तितका आंबेडकरांचा वारसा समजने त्यांना सोपे जाईल. जातीय व्यवस्था व जातीय छळवाद



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

नष्ट झाला तरच आर्थिक विकास होईल. हे आंबेडकरांचे सांगणे विसरून दलित कार्यकर्ते बहुकेंद्रीतेच्या अन्य समर्थकांप्रमाणे जातीविशिष्ट अस्मिताचे आधार जवळ करीत राहतात. व्यापक सामाजिक परिवर्तनाचा ध्येयवाद मागे पडून, विद्यमान व्यवस्थेतच जास्तीत जास्त वाटा पदरात पाडून घेणाऱ्या दबावगटांच्या भूमिकेत वावरतांना बहुतेक दलित संघटना त्यामुळे आज दिसतात. लिबरल सामाजिक मुक्तीच्याही दिशेने त्यांच्या चळवळी दलितांना घेऊन जाऊ शकत नाहीत. परिणामत: समाजवादाच्या घोषणा आणि भांडवलदार धार्जिणी धोरणे , धर्मनिरपेक्षतेच्या वल्गना आणि जमातवादी निवडणूक, राजकारण श्रमिकांच्या चळवळीचे दमन, मात्र धर्मांधाच्या उत्पातांशी राज्यसत्तेचे संगणमत, संविधानिक संरक्षणाचा उदोउदो; पण प्रत्यक्षात ती मात्र संबंधितांना लाभू नयेत अशी आतून फुटत चाललेली समाजरचना – या सर्व अंतर्विरोधी गदारोळात दलित चळवळीला आपली व्यूहरचना करायची आहे. हे अंतर्विरोधी आकस्मिक वा अपघातवजा नसून लिबरल लोकशाहीचे स्वरूप व तत्वज्ञान यांचे हे अंगभूत घटक आहेत; हे सर्वांनिच निट समजावून घेऊन मार्गक्रमण करणे नितांत गरजेचे आहेत.

**सारांश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रदिर्घ चळवळीच्या दरम्यान भिन्न भिन्न प्रकारच्या व्यूहरचना परिस्थितीला अनूसरून स्विकाराव्या लागल्या त्यांची एक मध्यवर्ती सूत्रे आणि आंबेडकर विचारांचा गाभा समजून घेता येतो तो म्हणजे, ' न्याय समाजव्यवस्था आणि तिच्यासाठी आवश्यक अशी मूलव्यवस्था' यांची चर्चा, व्यक्तीप्रतिष्ठा, व्यक्तीस्वातंत्र्य घटनात्मकता यांचे आंबेडकरांना आकर्षण होते. परिवर्तनावादी अर्थप्राप्तीसाठी स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या तीन तत्वातून साकारत जाणारा सामाजिक न्याय त्यांना अभिप्रेत होता. 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' मध्ये ते म्हणतात, "मला विचाराल तर माझा आदर्श समाज म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभावावर आधारित समाज असेल" [13] राजकारण, धर्मकारण, अर्थव्यवहार आणि मानवी संबंध ह्या तत्वावर आधारित असावेत असा त्यांचा आग्रह होता. "बंधुभाव आणि स्वातंत्र्याशिवाय समतेला काही मूल्य राहणार नाही, फक्त बुध्दांचा मार्ग चोखाळूनच या तिन्ही तत्वांचे सहअस्तित्व शक्य आहे. असे दिसते."[14] "माझे सामाजिक तत्वज्ञान हे निश्चितपणे तीन शब्दात गुंतले ते शब्द म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुभाव. तथापी हे माझे तत्वज्ञान फ्रेंच राज्यक्रांतीपासून मी उसने घेतले आहे. असे कोणी समजू नये. माझा गुरू बुद्ध, त्यांच्या शिकवणीपासून ते मी काढलेले आहे."[15]

"संसदीय लोकशाहीला विकृत रूप देणारी दुसरी चुकीची धारणा म्हणजे, जेथे आर्थिक व सामाजिक लोकशाही नाही तेथे राजकीय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही, या सत्याची जाणीव तीला कधीच झाली नाही. ……… याचा परिणाम असा झाला की, स्वातंत्र्याने समतोल गिळंकृत करून टाकले व लोकशाहीला केवळ नावापुरते व नाटकी रूप आणून सोडले."[16]



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli
Adarsh Arts & Commerce College Desaiganj

डॉ. आंबेडकर म्हणतात, स्वत:चे सामर्थ्य वापरून ध्येयसिध्दी करण्याला वाव असणे असा स्वातंत्र्याचा अर्थ आहे. ('कास्टम इन इंडिया' खंड 1, पृ.15) समाजातील व्यक्तींना स्वातंत्र्यअसावे आणि व्यक्तीविकास हे त्यांचे उद्दीष्ट असावे असा बाबासाहेबांचा विचार होता. त्यामुळेच 'स्टेट अँड मायनॉरिटीज' मध्ये समाज कल्याणासाठी योजना मूलभूत हक्कांच्या संदर्भात मांडली आहे व भावनात्मक हक्कांना प्राधान्य दिले. 'समतेचे तत्व उघडपणेच तर्कदृष्ट आहे' (The doctrine of equality is glaringly tallacious ) असा शेरा त्यांनी मारला. (खंड 1 पृ.58-58) "माझ्या तत्वज्ञानात बंधुतेला फार उच्च स्थान आहे. स्वातंत्र्य नि समता यांच्याविरूद्ध संरक्षण फक्त बंधुभावनेतच आहे." असे बाबासाहेब म्हणतात. (खरात) या बंधुभावाचा अर्थ "ॲनि हिलेशन" समाजरचना (Social Enosinosis) हे बंधुभावाचे लक्षणे आहेत. अर्थात 'बंधुभाव' हे लोकशाहीचे दुसरे नाव होय. आपल्या सभोवतालच्या माणसांबद्दल आदराची भावना म्हणजे बंधुभाव. न्याय्य हक्कांच्या पूर्ततेतून बाबासाहेबांचा बंधुभाव आकाराला येतो असे ते म्हणतात. पण अडथळा असा की, भारतीय समाजात समान दर्जाचा अभाव हे तर जातीय व्यवस्थेचे मूलतत्वच आहे. माणसाची व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा न मानणाऱ्या सामाजिक चौकटीत बंधुभावाचा प्रश्नच उद्भवत नाही. बाबासाहेबांनी विशिष्ट जातीला नव्हे, तर नवजात उच्च निच भावाला शत्रू मानले. 1 जुलै 1927 च्या "बहिष्कृत भारतात त्यांनी ही भूमिका मांडली."....... ब्राम्हण हे सर्वव्यापी परमेश्वराप्रमाणे हिंदूस्थानातील स्थिरचर सृष्टी व्यापून उरले आहे. बरेचसे अस्पृश्य असंख्य ब्राम्हणेत्तर व अगणित ब्राम्हण ज्ञानत: या ब्राहाण्याचे उपासक आहेत......"[17]

आजच्या लोकशाहीत अण्णांचे लोकपाल विधेयक तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग व सत्तारूढ पुरोगामी आघाडीच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या भूमिका, प्रसारमाध्यमांचा पक्षपात, अण्णांच्या आंदोलनातून उभ्या होऊ शकणाऱ्या सत्शक्तीचे स्वागत करावे की काय ? रामदेव बाबा यांचे आंदोलन, परदेशी बँकांमध्ये काही भाग्यवान भारतीयांनी अब्जावधी रूपये दडवून ठेवले असल्याचा साक्षात्कार हे पंडित नेहरूंच्या पूर्वी सुध्दा देशात चर्चीला गेलेला विषय, देशभक्ती दाखविण्याच्या उर्मीणे पेटलेल्या मुरली मनोहर जोशी यांनी माननिय बाजपेयींनी मनधरणी करूनही श्रीनगरच्या लाल चौकात राष्ट्रध्वज फडकविला पण त्या सोहळयाला एकही हजर नव्हता हे वास्तव. यावरूनच कॉंग्रेसपक्षाचे मौन, दिग्वीजय सिंग व बुवा, बाबा, बापू, अण्णा, भगवान किंवा श्री श्री अशी बिरूदे लावणाऱ्या पांढऱ्या व भगव्या वस्त्रातल्या माणसाविषयीची पूज्य बुध्दी आज समाजात दिसत आहे. यावरून नैतिकता संपूष्टात आल्याचे चिन्हच दिसत आहे. असे खेदाने म्हणावे लागते.

**संदर्भ**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरव ग्रंथ, प्रकाशक , सचिव, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, तिसरा मजला, 172, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मार्ग, दादर, मुंबई- 4000014

२. डॉ. भा. ल. भोळे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि उदारमतवादी लोकशाही, गौरव ग्रंथ



Adarsh Arts & Commerce College (Desaiganj)
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

३. डॉ. भा. ल. भोळे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि उदारमतवादी लोकशाही, गौरव ग्रंथ

४. डॉ. भा. ल. भोळे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि उदारमतवादी लोकशाही, गौरव ग्रंथ

५. डॉ. भा. ल. भोळे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि उदारमतवादी लोकशाही, गौरव ग्रंथ

६. प्रदिप चंपानेरकर, सुहास कुलकर्णी, असा घडला भारत, युनिक फिचर्स, रोहण प्रकाशन, दुसरी आवृत्ती, 26 फेब्रुवारी 2013

७. प्रदिप चंपानेरकर, सुहास कुलकर्णी, असा घडला भारत, युनिक फिचर्स, रोहण प्रकाशन, दुसरी आवृत्ती, 26 फेब्रुवारी 2013

८. प्रदिप चंपानेरकर, सुहास कुलकर्णी, असा घडला भारत, युनिक फिचर्स, रोहण प्रकाशन, दुसरी आवृत्ती, 26 फेब्रुवारी 2013

९. प्रदिप चंपानेरकर, सुहास कुलकर्णी, असा घडला भारत, युनिक फिचर्स, रोहण प्रकाशन, दुसरी आवृत्ती, 26 फेब्रुवारी 2013

१०. डॉ. भा.ल. भोळे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि उदारमतवादी लोकशाही, गौरव ग्रंथ

११. डॉ. भा.ल. भोळे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि उदारमतवादी लोकशाही, गौरव ग्रंथ

१२. डॉ. भा.ल. भोळे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि उदारमतवादी लोकशाही, गौरव ग्रंथ

१३. श्री. सुहास पळशिकर, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव (खंड 1, पृ. 57) "मुक्ती कोण पथे"

१४. श्री. सुहास पळशिकर, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव (खंड 3, पृ. 462) "मुक्ती कोण पथे"

१५. श्री. सुहास पळशिकर, खरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा पृ. 374-375


१६. श्री. सुहास पळशिकर, गांजरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड 2, पृ. 159-160

१७. सुरेश द्वादशीवार, सडेतोड, आर्ट ऑफ पोलिटिकींग, पृ. क्र. 19, प्रकाशक, सचिन उपाध्याय, विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सिताबर्डी , नागपूर-440012.

१८. डॉ. भा.ल.भोळे, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, प्रकाशक, मनोहर पिंपळापूरे, पिंपळापूरे अॅण्ड कं., पब्लिशर्स, हिंदू मुलींचे शाळेजवळ, महाल, नागपूर, आवृत्ती जून 2003.



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli
Adarsh Arts & Commerce College Desaiganj



## CONTACT FOR SUBSCRIPTION


AJANTA

ISO 9001: 2008 QMS/ISBN/ISSN

Vinay S. Hatole

Jaisingpura, Near University Gate,

Aurangabad (M.S) 431 004,

Cell : 9822620877, 9579260877 Ph: 0240 - 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com

Website : www.ajantaprakashan.com



Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL

Adarsh Arts & Commerce College,

Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli